# निविदा सूचना

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जालना विभाग, जालना सर्वे क्र. 488, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जालना, ता.जि. जालना-431213 या कार्यालयात **बहुदेशीय कुशल कर्मचारी कंत्राटी लिपिक टंकलेखक** -01 या पदाची आवश्यकता आहे. या करिता मनुष्य बळ पुरविण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदार / संस्था / कंपनी / एजेन्सी यांचेकडून खालील अटींच्या अधीन राहून निविदा मागविण्यात येत आहे.

१. वयोमर्यादा:- कमीतकमी 18 वर्षे व जास्तीत जास्त 43 वर्षे राहील.

२. शिक्षण:- I) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी आणि शासकीय परीक्षा मंडळाची वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मराठी टंकलेखन 30 श.प्र.मी व इंग्रजी टंकलेखन 40 श.प्र.मी. विषयासह उत्तीर्ण अथवा समकक्ष व महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाची एम एस सी आय टी परीक्षा उत्तीर्ण अथवा समक्ष

३. पद धारण करणारा व्यक्ती शारीरिक दृष्ट्या सक्षम असण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

४. कार्यालयीन वेळेत निमाप्रमाणे ड्रेस कोड धारण करावा. त्याबाबतची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

५. निविदांसोबत जोडलेले सर्व कागदपत्र साक्षांकित असावेत.

६. उपरोक्त कंत्राटी पदाच्या सेवेसाठी प्रत्येक माणसाकरिता आकारण्यात आलेला कामाचा मोबदला दर हा किमान वेतन कायदा 1948 प्रमाणे असावा. तसेच नियमितपणे पद निर्मिती केली असता जितका खर्च शासनास येईल त्या खर्चाच्या 20% ते 30% बचत होईल अशा रितीने प्रत्येक पदासाठी मानधन कंत्राटदाराने ठरवावे.

७. व्यसनाधीन, गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या सेवकास नियुक्ती देता येणार नाही. त्याबाबतीत नियुक्त कर्मचाऱ्याची पोलीस चारित्र्य पडताळणी (Police Verification) करून त्याचा अहवाल संबंधित कंत्राटदार / ठेकेदार / संस्था / कंपनी / एजेन्सी यांनी कार्यालयास सादर करणे बंधनकारक असेल.

८. बेशिस्त वर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यास या कार्यालयाने निर्देषित केल्यावर त्वरित काढून टाकावे लागेल व पर्यायी व्यवस्था करावी लागेल. कुठल्याही परिस्थितीत पर्यायी व्यवस्था न केल्यास संबंधित कंत्राटदार / ठेकेदार / संस्था / कंपनी / एजेन्सी यांना प्रतीदिवशी मनुष्यबळाचे प्रतिदिन वेतन याप्रमाणे दंडात्मक कारवाई केली जाईल व सदरचा दंड अनामत रकमेमधून वसूल केला जाईल.

10. निविदे सोबत नोंदणीकृत कंत्राटदार / ठेकेदार / संस्था / कंपनी / एजेन्सी शासनमान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे.

11. निविदाधारकास अस्तित्वात असलेल्या अनुषंगिक सर्व कायद्याचे पालन करणे बंधनकारक राहील.

12 . अंशदान निर्वाह निधी / भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनेची रक्कम प्रचलित दरानुसार दरात समाविष्ठ करून त्याचा भरणा संबंधित कार्यालयास करून, या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

13.उपरोक्त पदांना साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक राहील. परंतु, कार्यालयीन आवश्यकतेनुसार ज्यादाची सेवा पुरविणे कंत्राटदाराची जबाबदारी राहील.त्यासाठी अतिरिक्त देयक अदा करण्याची जबाबदारी या कार्यालयाची नसेल. कंत्राटी कर्मचार्याच्या रजेच्या दिवशी बदली

कर्मचारी देणे हि कंत्राटदाराची असेल त्या बाबत कोणताही अतिरिक्त देयक मिळणार नाही

14. सदरील कर्मचाऱ्यांना अपघात झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कर्मचाऱ्याकडून कार्यालयास / इतरास नुकसान झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

15. नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यास मिळणारे कोणतेही फायदे कंत्राटी कर्मचाऱ्यास देय असणार नाही.

16. कुठलेही कारण न देता कुठल्याही वेळी कंत्राट रद्द करण्याचे सर्व अधिकार, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जालना विभाग, जालना यांना असतील.

17. कंत्राटदार / ठेकेदार / संस्था / कंपनी / एजेन्सी तर्फे काम करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

18. नियुक्त कर्मचारी हा संस्थेचा/एजन्सीचा कर्मचारी असेल. त्याचे कार्यालयाशी मालक-सेवक असे नाते राहणार नाही व तो शासनाच्या सेवेत सामावून घेण्यासाठी पात्र राहणार नाही व तसा हक्क तो सांगू शकणार नाही . त्यास शासकीय सेवकाचे कोणतेही फायदे अथवा सवलती देय असणार नाही.

19. कर्मचाऱ्याचे वेतन, भविष्य निर्वाह निधी (PF), राज्य कामगार विमा (ESIC), बोनस आणि इतर सर्व वैधानिक देणी वेळेवर अदा करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदार संस्थेची असेल.

20. प्रत्येक महिन्याचे वेतन पुढील महिन्याच्या 7 तारखेपर्यंत कर्मचाऱ्याच्या बँक खात्यात जमा करणे आणि त्याची पावती (उदा. PF/ESIC चलन) कार्यालयास सादर करणे बंधनकारक असेल. बिल सादर करताना या पावत्या जोडणे आवश्यक आहे.

21. संस्थेने कर्मचाऱ्याला ओळखपत्र व गणवेश (Uniform) पुरवणे बंधनकारक आहे.
कर्मचारी रजेवर किंवा गैरहजर असल्यास, संस्थेने तत्काळ पर्यायी व्यवस्था करावी,अन्यथा दंडात्मक कारवाई केली जाईल.

22. कंत्राटी लिपिक टंकलेखक यांना कार्यालय प्रमुख सहायक धर्मादाय आयुक्त , अधीक्षक यांनी नेमून दिलेले कोणतेही काम करणे बंधनकारक असेल व या बाबत तक्रार चालणार नाही .

23. कार्यालयाने निश्चित केलेल्या कार्यालयीन शिस्तीचे व नियमांचे पालन करणे कर्मचाऱ्यास बंधनकारक राहील.

24. सदरील निविदा प्रक्रिया राबवीत असताना आवश्यकता असल्यास वेळोवेळी अटी व शर्तीमधील बदल करणेबाबत किंवा निविदा प्रक्रिया रद्द करणेबाबत शुद्धिपत्रक किंवा सूचना हि निविदा दाखल करणाऱ्यावर बंधनकारक राहील. असे शुद्धिपत्रक किंवा सूचना हि कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रकाशित करण्यात येईल.

25. करार संपुष्टात आणायचा असल्यास, दोन्ही पक्षांना एक महिन्याची लेखी नोटीस देणे बंधनकारक राहील.

26. निविदा मंजूर झाल्यास कंत्राटदारास या कार्यालयाशी योग्य त्या मुद्रांक शुल्काचा लेखी करार करावा लागेल. मुंद्राक शुल्काचा भरणा करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

27. सुरक्षा ठेव ( Security Deposit): यशस्वी निविदा धारकास कार्यादेश मिळाल्यानंतर 7 दिवसांच्या आत ऐकून वार्षिक कराराच्या 3% रकमेची सुरक्षा ठेव कार्यालयाकडे जमा करावी लागेल. हि रक्कम कंत्राट कालावधी यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर परत केली जाईल.

28. कंत्राट कालावधी: सदर कंत्राट सुरुवातीला 11 महिन्यांच्या कालावधीसाठी असेल. संस्थेचे काम

समाधानकारक असल्यास आणि कार्यालयाची आवश्यकता असल्यास, दोन्ही पक्षांच्या संमतीने मुदतवाढ दिली जाऊ शकते.

29.अधिकार: कोणताही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अथवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार  सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जालना विभाग, जालना यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीकडे राखून ठेवला आहे.

30.वाद निवारण: निविदेसंदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास, तो जालना न्यायालयाच्या कार्यक्षेत्राच्या अधीन राहील.

31.उपरोक्त  पदाचे निविदा देत असताना, मा. सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जालना विभाग, जालना यांच्याकडे सिलबंद लिफाफ्यात दि. 11/02/2026 ते 27 /02/2026 पर्यंत सायंकाळी 06:00 वाजेपर्यंत सादर करावे.

32.उपरोक्त पदाकारीतांच्या स्वतंत्र निविदा लिफाफ्यामध्ये सिलबंद करून त्यावर पदाचे नाव नमूद करून त्या पदासाठीची निविदा असे नमूद करणे आवश्यक आहे.

33.सदरील निविदा सूचना https://charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

Suyadey R.S.

( श्रीमती सु.रा.शिंदे )
सहायक धर्मादाय आयुक्त
जालना विभाग जालना  तथा
अध्यक्ष , अंतर्गत खरेदी समिती

## निविदा प्रक्रिया कार्यक्रम

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| 1 | जाहीर निविदा सूचना प्रसिद्ध करणे | 11/02/2026 |
| 2 | सीलबंद निविदा स्वीकारणे | 12/02/2026 ते 27/02/2026 रोजी संध्याकाळी 6.00 पर्यंत |
| 3 | निविदा उघडण्याची तारीख | 04 /03/2026 दुपारी 3.30 वाजता |
| 4 | समितीच्या संमती नुसार तुलनात्मक तक्ता तयार करणे व निविदा स्वीकृत करणे | 04 /03/2026 |
| 5 | मा. धर्मादाय सह आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांचे मार्फत प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी पाठवणे | 05 /03/2026 |
| 6 | निविदा धारकास कंत्राटी मनुष्य बळ पुरविण्यासाठी पुरवठा आदेश देणे | शासनाच्या मंजुरी नंतर |